# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक २२/०८/२०२४ (गुरूवार) सायंकाळ**

---

## घरफोडीचा प्रयत्न करणारा आरोपी कोंढाळी पोलीसांच्या जाळयात

दिनांक २१/०८/२०२४ चे ०२.३० वा. ते ०३.०० वा. दरम्यान मौजा बाजारगाव येथे **आरोपी नामे– हर्षद किरण माणे वय २४ रा. सांगवळे ता. करवीर जि. नागपुर** याने चोरी करण्याचे उद्देशाने बॅक ऑफ इंडिया बाजारगाव येथील बॅकेचे जिन्या जवळील काच काढुन बॅकेचे समोरील दरवाज्याचे कुलुप तोडुन आतमध्ये चोरी करण्याचे उद्देशाने प्रवेश केला. अशा फिर्यादी नामे– सौ. जया अभिषेक ठवरे, वय ३७ वर्ष रा. मेश्राम ले आउट नागपुर यांचे रीपोर्ट वरून पोस्टे कोंढाळी येथे कलम ३३१(४), ३०५, ६२ बीएनएस अन्वये गुन्हा नोंद केला होता.

सदर घटनेची माहिती मिळताच कोंढाळी येथील पोलीस पथक यांनी तात्काळ घटनास्थळी पोहचुन **आरोपी नामे– हर्षद किरण माणे वय २४ रा. सांगवळे ता. करवीर जि. नागपुर** यास बाजारगाव येथुन ताब्यात घेतले.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे कोंढाळी येथील ठाणेदार सपोनि. राजकुमार त्रिपाठी, पोउपनि देशमुख, सफौ सरोदे, पोअं. नासरे यांनी पार पाडली. गुन्हयाचा पुढील तपास सफौ सुनिल बंसोड हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर